| | | |
|---|---|---|
| | **वाकड पोलीस ठाणे,**<br>**पोलीस आयुक्तालय, पिंपरी - चिंचवड** | |
| | **प्रेसनोट** | दिनांक: १३/११/२०२४ |

## रेकॉर्डवरील आरोपीचे ताब्यातून ०१ पिस्तुल व ०२ जिवंत काडतुसासह अटक
## वाकड पोलीस ठाणे तपास पथकाकडून अटक

---

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात सार्वत्रिक विधानसभा निवडणुक २०२४ चे अनुषंगाने सर्व प्रकारचे अवैध धंदे तसेच बेकायदा अग्नीशस्त्रे बाळगुन त्याद्वारे समाजात दहशत माजविणा-या गुन्हेगारांवर कारवाई करणेबाबत मा. श्री.विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.डॉ. शशीकांत महावरकर, पोलीस सह आयुक्त, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी विशेष मोहिम राबवून कारवाई करणेकरिता आदेशीत केले आहे.

त्याअनुषंगाने मा. श्री. विशाल गायकवाड सो, पोलीस उप आयुक्त, परि-२ पिंपरी चिंचवड, श्री.सुनिल कुराडे, सहा. पोलीस आयुक्त सो, वाकड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली विशेष मोहिम चालू आहे. त्यानुसार वाकड पोलीस ठाणचे श्री. निवृत्ती कोल्हटकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांना वाकड पोलीस ठाणे हद्दीत अवैध अग्निशस्त्रे बाळगणारे खरेदी-विक्री करणारे गुन्हेगारांवर कारवाई करणेबाबत सुचना दिलेल्या असताना आज दिनांक १३/१०/२०२४ रोजी वाकड पोलीस ठाणे तपास पथकाचे सपोनि. एस.एस. चव्हाण, पोउपनि.अनिरुध्द सावर्डे यांना त्यांचे अंमलदार यांचेसह पोलीस ठाणे हद्दीत सार्वत्रिक विधानसभा निवडणुक २०२४ चे अनुषंगाने सर्व प्रकारचे अवैध धंदे, रेकॉर्डवरील गुन्हेगार यांचे हालचालींवर लक्ष ठेवून पेट्रोलिंग करीत असताना दिनांक १३/११/२०२४ रोजी १८:४० वा. सुर्या अंडरपास ते वाकड गाव गावठाणकडे जाणारे रोडवर स्टेलर रिदम सोसायटीचे कॉर्नर, वाकड, पुणे एक संशयीत इसम नामे शहनवाज मुस्ताक शेख, वय २० वर्षे, रा. भिमक्रांती नगर, पत्रा शेड, अंकुर चौक, स्पाईन रोड, निगडी, पुणे, मुळ रा. बिहार राज्य यास ताब्यात घेऊन त्यांची अंगझडती घेतली असता त्याचे कब्जात बेकायदेशीर ०१ पिस्तुल व ०२ जिवंत काडतुसे मिळून आले. सदरचे अग्नीशस्त्र जवळ बाळगण्याचा कोणताही परवाना नसताना ते आरोपीने जवळ बाळगून मा. पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड यांचे मनाई आदेशाचे उल्लंघन केले म्हणून आरोपी विरुध्द वाकड पोलीस ठाणे येथे गु.रजि.नं. १२३९/२०२४ भारताचा शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३, २५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१) (३) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल असुन आरोपीस दिनांक १३/११/२०२४ रोजी अटक केली आहे. अटक आरोपी याचेवर भोसरी पोलीस ठाणे गु.र.नं. ४३०/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३०९(४), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदरची कारवाई मा. श्री.विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.डॉ. शशीकांत महावरकर, पोलीस सह आयुक्त, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री. विशाल गायकवाड सो, पोलीस उप आयुक्त, परि-२ पिंपरी चिंचवड, श्री.सुनिल कुराडे, सहा. पोलीस आयुक्त सो, वाकड विभाग, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली श्री.निवृत्ती कोल्हटकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्रीमती निता गायकवाड, पोलीस निरीक्षक (गुन्हे), सपोनि. एस.एस.चव्हाण, पोउपनि. अनिरुध्द सावर्डे, पोलीस अंमलदार वंदु गिरे, संदीप गवारी, दिपक साबळे, विजय घाडगे, विजय भुसारे, राम तळपे, तात्यासाहेब शिंदे, सौदागर लामतुरे, कौंतेय खराडे यांनी मिळुन केली असून पुढील तपास सपोनि. एस.एस. चव्हाण करीत आहेत.

**(विशाल गायकवाड)**
पोलीस उप आयुक्त,